# को.ए.सो. रामभाऊ पाटील हायस्कूल, बामणगाव (कावीर)

अहवाल वर्षी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०१६ चा निकाल ९४.१२% लागला. एकूण १३६ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाले पैकी १२८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यामध्ये कु. यश संजय वळजू ह्याने ९०.८०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला तर कु. आदित्य देवेंद्र पोवळकर याने ८८.६०% गुण मिळवून द्वितीय व कु. योजना प्रवीण ठाकूर ८८.००% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. निकाल वृद्धीसाठी शाळेत जादा तासिका, सराव परीक्षा, पर्यवेक्षित अभ्यास, उजळणी वर्ग, मार्गदर्शन शिबीर, पालक संपर्क अभियान इत्यादी उपक्रम राबविले गेले.

को.ए.सो. आंतरशालेय वाक्स्पर्धा ९ वी, १० वी उत्स्फूर्त गट हिंदी कु. जिग्ना रविंद्र पाडेकर हिने ४ था क्रमांक मिळविला. गीत गायन स्पर्धा ७ वी, ८ वी गट कु. श्रद्धा देवानंद वैशंपायन हिने प्रथम क्रमांकाचे यश संपादन केले. तर ५ वी, ६ वी गट कु. पूर्वा धनंजय कुटे हिने तिसरा क्रमांक मिळविला.

को.ए.सो. आंतरशालेय निबंध स्पर्धा ९ वी, १० वी गट कु.यश संजय वळजू यांने मराठी विषयात प्रथम क्रमांक मिळविला तर ९ वी, १० वी गट मराठी कु. अक्षता विकास तेलंगे हिने हिंदी विषयात तृतीय क्रमांक मिळविला.

लायन्स क्लब अलिबाग तर्फे घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत ७ वी, ८ वी गट मराठी कु. आदिनाथ रविंद्र पाडेकर यांने प्रथम क्रमांक मिळविला तर ९ वी, १० वी गट मराठी कु. अक्षता विकास तेलंगे हिने तृतीय क्रमांक मिळविला.

तालुका विज्ञान प्रदर्शनातील वाक्स्पर्धेत कु. श्रद्धा देवानंद वैशंपायन हिने प्रथम क्रमांक तर प्रश्नमंजुषा स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला.

१८ डिसेंबर को.ए.सो. च्या इतिहासातील अत्यंत महत्वाचा दिवस! हा दिवस सोसायटी डे म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. परिसरातील खेड्यातून विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली, संस्थेच्या यशाचा गौरव करणाऱ्या घोषणा देण्यात आल्या. २१ फेब्रुवारी रोजी स्व. प्रभाकर पाटील पुण्यतिथी, ४ मार्च रोजी स्व. दत्ता पाटील जयंती साजरी करण्यात आली, सर्व विद्यार्थी व सेवकांतर्फे मानवंदना देऊन विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

मा. मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली वर्षभरातील दिन विशेष, समाजसेवा शिबीर, वृक्षारोपण, वर्षाविहार, शैक्षणिक सहल, स्नेहसंमेलन, क्रीडास्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन, वाक्स्पर्धा, काव्य गायन स्पर्धा इत्यादी विविध स्पर्धा व उपक्रम यशस्वीरित्या राबविले.

शाळेचा नवीनच पदभार स्वीकारलेल्या मा. मुख्याध्यापिका सौ. सुषमा पाटील यांच्या मार्गदर्शनाने १ जुलै २०१६ रोजी वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित केला होता यामध्ये शाळेच्या परिसरात १०० झाडे लावण्यात आली.



कु. वळंजू यश संजय
एस. एस.सी. (९०.८०%)



०१ जुलै २०१६ रोजी वृक्षारोपण करून कृषिदिन साजरा करताना मा. मुख्याध्यापिका श्रीम. सुषमा पाटील, पर्यवेक्षक मा. म्हात्रेसर व सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी.



शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेल कार्यक्राम प्रसंगी व्यासपिठावर उपस्थित सर्व मान्यावर